क्र.सिडको/कार्मिक/भरती/लेखा लिपिक/२०२३/ दिनांक २९.१२.२०२३

# शुध्दीपत्रक-१

**विषय - दिनांक ०९.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या लेखा लिपिक या संवर्गातील रिक्त पदांच्या जाहिरातीबाबत शुध्दीपत्रक.**

सदर शुध्दीपत्रकाव्दारे प्रसिध्द करण्यात येते की,

**१.** दिनांक ०९.१२.२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमधील पृष्ठ क्र.१० वरील **मुद्दा क्र.१२- 'अमागास महिला'** हा मुद्दा वगळण्यात आला आहे. सदर मुद्दा अमागास महिलांच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राबाबत असून सदर बाबत पृष्ठ क्र.५ व ६ वरील **मुद्दा क्र. १०- 'महिलांसाठीचे आरक्षण'** हा मुद्दा लागू राहील.

**२.** जाहीरातीमधील पृष्ठ क्र.११ वरील **मुद्दा क्र.१३ — 'मागासवर्गीय महिला' (६)** मध्ये " मागास प्रवर्गातील महिला तिच्या संबंधित प्रवर्गाकरीताचे जात प्रमाणपत्र सादर करु शकत नसल्यास किंवा सादर करु इच्छित नसल्यास अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता अमागास खुल्या महिलांकरीताचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल " असे लिहिले आहे

त्याऐवजी पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे :-

"मागास प्रवर्गातील महिला, संबंधित मागास प्रवर्गाकरीताचे जात प्रमाणपत्र सादर करु शकत नसल्यास किंवा सादर करु इच्छित नसल्यास, सदर महिलांना अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करावयाचा असल्यास, सदर अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्रमांक — महिआ २०२३/प्र. क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४.०५.२०२३ अन्वये नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही ."

**महाव्यवस्थापक (कार्मिक)**
**दुसरा मजला, कार्मिक विभाग, सिडको भवन**
**सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई -४००६१४**
**फोन -०२२ ६७९१८२४९**